**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

**जाहीर ई-निविदा**

श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय,लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी सन २०२२-२३ करीता (एप्रिल २०२२ ते मार्च २०२३) खालील साहित्य खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक, उत्पादक यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं | निविदेचा तपशील | निविदा फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | पेपर कप | १४,५२०/- | १,४५,२००/- |
| ०२ | टोन्ड गाय दुध | ३३,०००/- | ३,३०,०००/- |
| ०३ | पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर | १९,८००/- | १,९८,०००/- |
| ०४ | पेपर पिशवी | १९,८००/- | १,९८,०००/- |

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींग व अपलोडींगसाठी दि.२४/ ३ /२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. ८ / ४ /२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदा फी व बयाणा रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

४. दि. ९ / ४ /२०२२ ते दि. ११ / ४ /२०२२ या कालावधीत सायं.०५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) निविदेमध्ये दर भरलेल्या साहित्याचे नमुने शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि. १२ / ४ /२०२२ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी

**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**

At/post-Shirdi, Tal-Rahata, Dist- Ahmednagar- 423109
Phone No.(02423) 258500/771/772, Fax No.02423-258870
(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

## E-TENDER NOTICE

E-tenders are invited from Suppliers, Manufacturers, Dealers for the supply of following material for our Prasadalya, Ladu Nirmiti, Canteen & Temple Department for the year 2022-23 (April 2022 to March 2023).

| Sr.NO | Tender Description | Tender Fee | E.M.D. |
|---|---|---|---|
| 01 | Paper cup | 14,520/- | 1,45,200/- |
| 02 | Toned Cow Milk | 33,000/- | 3,30,000/- |
| 03 | Packaged Drinking Water | 19,800/- | 1,98,000/- |
| 04 | Laminated Paper Bags | 19,800/- | 1,98,000/- |

1. E-Tenders & its terms and conditions are available on www.mahatenders.gov.in.
2. The E-Tenders are available for Downloading & Uploading from Dt. 24/ 3 /2022 11.00 AM to 8 / 4 /2022 up to 5 PM.
3. Tender Fee & EMD should be paid Online on the website www.mahatenders.gov.in
4. The samples of Material are to be submitted from 9 / 4 /2022 10 AM to 11 / 4 /2022 up to 5.00 PM at our Shirdi Purchase office on all working days except Sunday.
5. If possible Technical Bids will be opened on 12/4 /2022.

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to accept partly/fully any tender or reject all tenders without assigning any reason thereof.

(Bhagyashree Banayat, I.A.S.)
Chief Executive Officer

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.

तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक ०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

मुंबई कार्यालय - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

## सन २०२२-२३
## (माहे एप्रिल-२०२२ ते मार्च-२०२३ अखेर)
## श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी ४ तिमाहीकरीता टोन्ड गाय दुध पुरविणेबाबत ई-निविदा

१. एप्रिल २०२२ ते जुन २०२२
२. जुलै २०२२ ते सप्टेंबर २०२२
३. ऑक्टोबर २०२३ ते डिसेंबर २०२२
४. जानेवारी २०२३ ते मार्च २०२३

A. **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागांसाठी टोण्ड गाय दुध पुरविणेबाबत ई-निविदा**

B. **ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने FSSAI परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या ३ आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य रहिल. निविदाधारकाची वरील नमूद ३ आर्थक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रु.१,२१,०१,०००/-असणे अनिवार्य राहील.

६. दूध खरेदीसाठी उत्पादक संस्थेच्या/अधिकृत वितरकांच्या निविदा स्वीकारण्यात येतील. तथापि निविदाधारक अधिकृत वितरक असेल तर ज्या संस्थेचे अधिकृत वितरक आहे, त्या संस्थेचे अधिकृत वितरक असल्याचे प्रमाणपत्र निविदेसोबत ऑनलाईन जोडणे अनिवार्य राहील.

C. **निविदाधारकाने दूधाचे नमुने सादर करण्याची पध्दत-**

१. निविदाधारकाने निविदा भरलेल्या ब्रॅन्डचे दुधाची रिकामी ५०० मिलीची पिशवी सिलबंद पाकीटात श्री साईबाबा संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. पाकीटावर ब्रॅन्डचे नांव तसेच आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२. दूधाच्या एका ब्रॅन्डसाठी उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

३. निविदा भरलेल्या टोण्ड गाय दुधाची ५०० मिलीची पिशवी नमुने निवडीच्या दिवशी सकाळी १० वाजता श्री साईबाबा संस्थानच्या खरेदी विभागाकडे जमा करावी लागेल.

४. निविदाधारकाने टोण्ड गाय दुधाचे ब्रॅन्डचा नमुना देताना असा नमुना द्यावा की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच ब्रॅन्डचा संस्थानला पुरवठा होईल. तसेच निविदाधारकाने नमुना जमा करताना कोणत्या ब्रॅण्डचे दूधाचा पुरवठा करणार आहे ते लेखी पत्रावर लिहून देणे गरजेचे आहे.

D. **पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. टोन्ड गाय दूध निविदा भरणेकामी एप्रिल २०२२ ते जून २०२२, जुलै २०२२ ते सप्टेंबर २०२२, ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ व जानेवारी २०२३ ते मार्च २०२३ अशा प्रत्येकी ३ महिन्याच्या कालावधीसाठी BOQ चे ४ भाग करण्यात आले आहेत. निविदाधारकास निविदा भरणेकामी वरील नमूद कालावधीप्रमाणे ४ BOQ मध्ये ऑनलाईन दर भरावे लागतील. तथापि निविदेत एक/दोन/तीन/चार अशा कुठल्याही एका भागासाठी दर भरल्यास अगर ४ ही भागांसाठी दर भरल्यास निविदा फी व बयाणा रक्कम तेवढीच राहील निविदाधारकास ४ ही तिमाहीसाठीची निविदा भरणे बंधनकारक नाही. प्रत्येक तिमाहीचे दरांचा स्वतंत्र विचार करुन अंतिम निर्णय घेण्यात येईल.

२. निविदा फी रक्कम रु.३३,०००/- व बयाणा रक्कम रु.३,३०,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

## E. निविदाधारकांसाठी सुचना-

१. सदर निविदा दि.२८/ ३ /२०२२ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. ६ / ४ /२०२२ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदा भरलेल्या दुधाचे नमुने दि. ९ / ४ /२०२२ ते दि. ११ / ४ /२०२२ अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) श्री साईबाबा संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि.१२/ ४ /२०२२ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्याच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमधील तक्त्यात नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

## F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, जकात, वाराई वगैरे सर्व खर्च तसेच शिर्डी संस्थानचे कॅन्टीन विभागामध्ये पोहोचचे वाहतूक खर्च या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## G. ऑनलाईन निविदा उघडण्याची व नमुने निवडण्याची कार्यपध्दती-

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खेरदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या दूध पिशवीचे नमुने तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील.

२. नमुने निवडून अंतिम झालेनंतर कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन नमुने निवड झालेल्या निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.



21/4/2022

## H. टोन्ड गाय दूध पुरवठा करावयाचे ठिकाण व दूध स्पेसिफीकेशन -

१. निविदेत नमूद केलेल्या दूध पिशवीचा पुरवठा शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागामध्ये तसेच श्री साईबाबा संस्थानच्या ५०० रुममधील कॅन्टीनमध्ये दोन वेळेस गरजेनुसार करावा लागेल. तसेच गर्दीचेवेळी दूधाची मागणी केल्यास ते पुरविणे आपल्यावर बंधनकारक राहील.

२. गाय दूध होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड (३.५% फॅट, ८.५ एसएनएफ) गुणप्रतीचे, १/२ लिटर पॉलीथीन पॅकिंगमध्ये पुरविणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा कमी गुणप्रतीचेदूध पुरविल्यास मा.दुग्धविकास मंत्रालय, महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.एमएलके १०९९/प्रक्र३२१/पदुम८ दि.२७/१२/२००० मधील दूध खरेदीबाबतच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक ०.१ कमी फॅटसाठी ३५ पैसे कपात करणेत येईल.

३. मागणी करणेत आलेले दर हे पूर्ण वर्षासाठी ४ टप्प्यांमध्ये मागविलेले असल्याने कृषकाळ व पुष्टकाळाचे वेगवेगळे दर दिले जाणार नाहीत. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही/मागता येणार नाही. मंजूर दरामध्येच निविदा पुरवठा कालावधीत दूधाचा पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

## I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत दुधाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून श्री साईबाबा संस्थानकडे ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या दूधाचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.

## J. दुधाचा पुरवठा करण्याची मुदत -

१. दूधाचा पुरवठा करण्याचा कालावधी एप्रिल २०२२ ते जून २०२२, जुलै २०२२ ते सप्टेंबर २०२२, ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ व जानेवारी २०२३ ते मार्च २०२३ असा राहिल.

२. शिर्डी येथे दर्शनासाठी भेट देणा-या साईभक्तांच्या गर्दीवर हि सेवा अवलंबुन असलेमुळे प्रत्येक महिन्यात अगर कमी जास्त मुदतीत अगर श्री साईबाबा संस्थानचे धोरणानुसार गरजेप्रमाणे दूधाची मागणी केली जाईल. श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागाने केलेले मागणीप्रमाणे वेळोवेळी दूधाचा पुरवठा करावा लागेल. तसेच मागणीपेक्षा जादा आलेले दूध स्विकारले जाणार नाही.

३. श्री साईबाबा संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा दूधाची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या दूधाचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेले सर्व दूध घेणे श्री साईबाबा संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

...३...

**K. दूधाचा स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील ब्रॅन्डप्रमाणेच ५०० मिलीचे पॉलीथीन बॅगमध्ये वर नमूद स्पेसिपिफकेशनप्रमाणेच दूधाचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच दूधाचे बिल सादर करावे.

२. ज्या दूधाच्या ब्रॅन्डच्या निविदा मंजुर होतील ते दूध पुरवठा आदेशात नमूद केलेले वर्णनाप्रमाणे पुरवावे लागेल. कमी दर्जाचे, वेगळ्या ब्रॅन्डचे किंवा खराब दूध स्विकारले जाणार नाही. असे दूध पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर त्या ब्रॅन्डप्रमाणेच दूध पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

४. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे दूध पाठविल्यानंतर श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागाकडे दूधाची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास दूध स्विकारण्यात येईल. पुरवठाधारकांनी दिलेल्या ब्रॅन्डचे व पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे दूध पुरविण्याची दक्षता घ्यावी.

५. पुरवठा करीत असलेल्या दूधाची Quantity जास्त असल्यामुळे श्री साईबाबा संस्थानकडून Randomly Sample घेऊन दूध स्वीकारले जाते. तथापी दूध स्विकारलेनंतरही एखादा लॉट अगर काही दूध खराब आढळल्यास ते स्वखर्चाने बदलून द्यावे लागेल.

७. दूध पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार दूधाच्या ५०० मिलीच्या प्रत्येक पिशवीवर Date of Packing, Quantity and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

८. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या दूधामध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत पुरवठाधारकाची राहील.

९. दूधाचे पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.

**L. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१. पुरविलेल्या दूधाची गरजेनुसार श्री साईबाबा संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. श्री साईबाबा संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या दूधाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास पुरविलेले दूध किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात यईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेले दूध वापरले गेले व नंतर लॅब रिपोर्ट FSSAI Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील दूधाच्या किंमतीच्या २ ते ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

४. दूधाचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस FSSAI Standards नुसार न आलेस सदर पुरवठाधारकावर संस्थान प्रशासनाकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. श्री साईबाबा संस्थान लॅबचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास केंद्र शासनाच्या मुंबई येथील शासकीय/NABL लॅबमध्ये तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजन्यात येईल.

...४...

## M बील आदा करण्याची पध्दती-

१. पुरविलेल्या दूधाचे बिल तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. दूधाची तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या दूधाचे बील श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

३. पुरवठाधारकाने पुरविलेले दूध श्री साईबाबा संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून दूध खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा श्री साईबाबा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुन वसुल केली जाईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

## N. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-

१. पुरवठा आदेशातील दूध वेळेवर/मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या दूधाची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या दूधाची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. दररोज दूध पुरविणेचा आदेश कॅन्टीन विभागामार्फत दुरध्वनीवरुन दिला जाईल. त्यांनी दिलेले मागणी व Schedule प्रमाणे दूधाचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे दूध नाकारले गेल्यास श्री साईबाबा संस्थानची अडचण होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने गरजेइतके किंवा दिलेल्या पुरवठा आदेशाइतके दूध दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या दूधासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या दूधाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाला राहील.

३. श्री साईबाबा संस्थानने मंजूर केलेल्या दराने व निवडलेल्या ब्रॅन्डप्रमाणे दूध पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने दूध पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा दूध पुरवठा न केल्यास श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन दूध खरेदी करावे लागल्यास जादा येणारा खर्च/नुकसान भरपाई म्हणून पुरवठाधारकाकडून वसुल केला जाईल. तसेच याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक दुधाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

## O निविदा वैधता कालावधी-

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी हा ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

## P. सर्व साधारण अटी शर्ती

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात दूध पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या दूधाच्या ५० टक्के दूधाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण दूधाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. पुरवठादाराने दुधाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच श्री साईबाबा संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठादारावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची काहीही तक्रार चालणार नाही.

६. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

८. महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभागाने दि.२३.०३.२०१८ व दि.३०.०६.२०१८ नुसार प्लॅस्टिक वापराबाबतचे अधिसुचना सर्व निविदाधारकांना बंधनकारक राहिल. तसेच यापुढे शासनाने दूधासाठी वापरल्या जाणा-या प्लॅस्टिक पिशवीच्या गेजमध्ये काही बदल केल्यास त्याप्रमाणे सुधारीत लागू झालेले नियमाप्रमाणे प्लॅस्टिक पिशवीचा वापर करून दूध पुरविणे पुरवठाधारकास बंधनकारक राहिल.

९. निविदाधारकाला सदर ई-निविदेबाबत काही शंका असल्यास अगर काही माहिती पाहिजे असल्यास खरेदी विभाग कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०२४२३-२५८७७१ किंवा ०२४२३-२५८७७२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

१०. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

2312



२१/२/२०२

# निविदाधारकाबाबत माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | फर्मचे नांव- | ------------------------------------------------------- |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ------------------------------------------------------- |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------------- |
| | ऑफीस- | ------------------------------------------------------- |
| | दुकान- | ------------------------------------------------------- |
| | निवास- | ------------------------------------------------------- |
| | मोबाईल नंबर- | ------------------------------------------------------- |
| | फॅक्स नंबर- | ------------------------------------------------------- |
| | ई –मेल | ------------------------------------------------------- |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ------------------------------------------------------- |
| | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- | ------------------------------------------------------- |
| ५. | मालकाचे/भागीदारांची नावे | १. ------------------------------------------------------- |
| | | २. ------------------------------------------------------- |
| ६. | बॅंक खाते नांव | १.------------------------------------------------------- |
| | शाखा | २. ------------------------------------------------------- |
| | खाते नंबर व प्रकार | ३.------------------------------------------------------- |
| | आयएफएससी कोड | ४.------------------------------------------------------- |

दिनांक :- / /२०२२

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का



२८/८/२०२२

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला
उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. सन २०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१ या ३ वर्षाचे सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र

५. अदयावत अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना (FSSAI परवाना)

६. अधिकृत वितरक असल्यास, अधिकृत वितरक असल्याचे प्रमाणपत्र

**ब) रिकाम्या दूधाचे पिशवीचा नमुना स्वतंत्र सिलबंद पाकीटामध्ये ब्रॅन्डचे नांव, फर्मचे नांव इ. तपशिलासह विहित तारखेला खरेदी विभागाकडे सादर करावे.**

**क) नमुने दिलेल्या दूध ब्रॅन्डचे नांव असलेची यादी**

दिनांक - / /२०२२
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी**,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– सन २०२२-२३ करिता कॅन्टीन विभागासाठी दुध पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या दुधाचा आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता श्री साईबाबा संस्थानचे गरजेप्रमाणे, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे कॅन्टीन पोहोच करण्याची हमी देतो. सदर दुधाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त दुधाची श्री साईबाबा संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या दुधाच्या ब्रॅण्डची निविदा मंजुर होईल त्या मान्य दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहीत केलेल्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे दुध वेळेवर शिर्डी येथील कॅन्टीन विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२२

ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ------------------------------------

(२) ------------------------------------

**सोबत**- कागदपत्रे

...९...

२१/२/२२

# वार्षीक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे

निविदेसंबंधित व्यवसायाची खालील नमूद आर्थिक वर्षाची उलाढाल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन -२०१८-१९ | |
| २ | सन -२०१९-२० | |
| ३ | सन -२०२०-२१ | |
| एकूण वार्षिक उलाढाल | | |
| ३ वर्षांची सरासरी उलाढाल | | |

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/सही शिक्का) नोंदणी क्रमांक.

दिनांक :- / /२०२२
ठिकाण :-



२८/२/२०२२

STATEMENT SHOWING PURCHASE TONED COW MILK FOR THE YEAR 2022-23

BOQ

**April -2022 to June-2022**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Litre | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Toned Cow Milk (Pasteurised & Homogenised) 3.5 Fat, 8.5 SNF, 500ml.Packing, Two Time Supply in a Day | 275,000 | Litre | | |

(Bhagyashree Banayat.I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

STATEMENT SHOWING PURCHASE TONED COW MILK FOR THE YEAR 2022-23

BOQ

**July-2022 to September-2022**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Litre | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Toned Cow Milk (Pasteurised & Homogenised) 3.5 Fat, 8.5 SNF, 500ml.Packing, Two Time Supply in a Day | 275,000 | Litre | | |

(Bhagyashree Banayat.I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

STATEMENT SHOWING PURCHASE TONED COW MILK FOR THE YEAR 2022-23

BOQ

**October-2022 to December-2022**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Litre | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Toned Cow Milk (Pasteurised & Homogenised) 3.5 Fat, 8.5 SNF, 500ml.Packing, Two Time Supply in a Day | 275,000 | Litre | | |

(Bhagyashree Banayat.I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

STATEMENT SHOWING PURCHASE TONED COW MILK FOR THE YEAR 2022-23

BOQ

**January-2023 to March-2023**

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Litre | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Toned Cow Milk (Pasteurised & Homogenised) 3.5 Fat, 8.5 SNF, 500ml.Packing, Two Time Supply in a Day | 275,000 | Litre | | |

(Bhagyashree Banayat.I.A.S)
Chief Executive Officer
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi